ग्रामस्तरावरील **"ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता"** व **"ग्राम आरोग्य समिती"** यांचे विलिनीकरण करून या विषयांसाठी ग्रामस्तरावर **"ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती"** अशी एकच समिती गठित करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु १००६/प्र. क्र. ३६९/ पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक ६ डिसेंबर, २००६**

**पहा** :- १) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र. ग्रापापु-१०९१/सीआर २६७/३९-अ, दिनांक १०.०९.१९९१
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु-१०९६/प्र.क्र.१२८०/पापु-०७, दिनांक २८.११.१९९६
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. संकीर्ण २०००/ प्र.क्र.२६१/कु.क.३, दिनांक १०.११.२०००
४) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु-१००१/प्र.क्र.१९०/ पापु-०७, दिनांक ३.९.२००१
५) दिनांक १ ऑगस्ट २००३ रोजी प्रसिध्द केलेला सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३
६) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु-१००५/प्र.क्र.७४ (२)/ पापु-०७, दिनांक २.५.२००५

**प्रस्तावना :**

गावातील पाणी पुरवठा योजनांच्या दैनंदिन देखभाल व दुरूस्तीचे काम पहाण्यासाठी व पाणी गुणवत्ता नियंत्रणासाठी ग्रामस्तरावर **ग्राम पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता समिती** गठीत करण्याबाबत सूचना संदर्भाधिन क्र.१ व २ येथील शासन निर्णयान्वये देण्यात आल्या असून या समितीची रचना व तिची कार्ये उक्त शासन निर्णयात देण्यात आली आहेत.

२. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी सन २००० मध्ये मागणी आधारित समूह सहभागाचे सुधारित धोरण जाहीर केल्यानंतर या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयात दिलेल्या सूचनांन्वये पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी ग्रामस्तरावरून करण्यासाठी **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती** गठीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून या समितीची रचना व तिची कार्ये त्यात नमूद करण्यात आलेली आहेत.

३. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये सुधारित कलम ४९ मध्ये अंतर्भूत करुन ग्रामस्तरावर गठित होणाऱ्या ग्राम विकास समित्यांना वैधानिक दर्जा देण्यात आला असून ग्रामस्तरावरील विविध विकास कामांसाठी ग्राम विकास समित्या गठित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

४. केंद्र शासनाने सन २००५ पासून सुरू केलेल्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (National Rural Health Mission) (NRHM) कार्यक्रमांतर्गत बालमृत्यु दर, माता मृत्यु दर व जनन दर कमी करणे, लसीकरण, कुपोषण व इतर आरोग्य विषयक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमांतर्गत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम, राष्ट्रीय रोग नियंत्रण कार्यक्रम, एकात्मिक बाल विकास प्रकल्प व इतर कुटुंब कल्याण विषयक कार्यक्रम अंतर्भूत करण्यात आलेले आहेत.

५. ग्रामीण जनतेला पिण्याचे शुध्द पाणी पुरविणे, कुपोषण व आरोग्य विषयक कार्यक्रम हे एकमेकांशी निगडीत असल्याने ग्रामस्तरावरून त्यांची अंमलबजावणी करताना या विविध कार्यक्रमांमध्ये समन्वय असणे आवश्यक असल्याने या कामांसाठी ग्रामस्तरावर वेगवेगळया समित्या गठित न करता हे काम ग्रामस्तरावरील एकाच समितीकडून करून घेणे आवश्यक असल्याने ग्रामस्तरावरील ग्राम आरोग्य समितीचे विलिनीकरण ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमध्ये करून या समितीचे नामाभिधान **"ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती"** असे करण्याची व ग्रामीण पाणी पुरवठा, स्वच्छता, आरोग्य व पोषण हे विषय या समितीच्या अखत्यारित आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन ग्रामस्तरावरून राबविण्यात येणारा पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक कार्यक्रम, आरोग्य विषयक कार्यक्रम तसेच, महिला व बाल विकास कार्यक्रम ग्रामस्तरावरील एकाच समिती मार्फत राबविण्यासाठी ग्रामस्तरावरील ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व ग्राम आरोग्य समिती यांचे विलिनीकरण करून, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील सुधारित कलम ४९ अन्वये **"ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती"** अशी एकच समिती गठित करण्यास व या समितीमार्फत पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक कार्यक्रम, आरोग्य विषयक कार्यक्रम तसेच महिला व बाल विकास कार्यक्रम राबविण्यास शासन मान्यता देत आहे.

२. **"ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची"** रचना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील सुधारित कलम ४९ नुसार राहील (प्रत सोबत **परिशिष्ट - १** मध्ये जोडली आहे) तर, या समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सोबतच्या **परिशिष्ट - २** मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार राहतील.

३. वरील प्रमाणे **"ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती"** गठित करण्यात आल्यावर या समितीचे सध्या असलेले बँक खाते फक्त पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी वापरात ठेवावे; तर आरोग्य, महिला व बाल विकास कार्यक्रमासाठी स्वतंत्र बचत बँक खाते

उघडण्यात यावे. हे स्वतंत्र बचत बँक खाते समितीचे अध्यक्ष व गावातील अंगणवाडी सेविका या दोघांच्या संयुक्त सहिने चालविण्यात यावे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत व आरोग्य तसेच पोषण कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणारा निधी या स्वतंत्र खात्यामध्ये जमा करण्यात यावा. या खात्यामधील जमाखर्चाची नोंद आशा / अंगणवाडी सेविका यांनी स्वतंत्र नोंदवहीव्दारे ठेवावी. जमाखर्चाची ही नोंदवही वेळोवेळी एएनएम/एमपीडब्ल्यू/ग्रामपंचायतीने तपासावी व सार्वजनिक तपासणीसाठी उपलब्ध ठेवावी. या निधीचा विनियोग करण्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभाग आणि महिला व बाल विकास विभागामार्फत वेळोवेळी देण्यात आलेल्या/येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि महिला व बाल विकास विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६१२०६१२३२०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि. शं. धुमाळ)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
मा.सदस्य, महाराष्ट्र विधान सभा / महाराष्ट्र विधान परिषद (सर्व)
अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (दोन प्रती)
सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (पत्राने)
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
जिल्हाधिकारी (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रकल्प व्यवस्थापक, जलस्वराज्य प्रकल्प, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
प्रकल्प अधिकारी, आपलं पाणी प्रकल्प, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर
प्रकल्प व्यवस्थापक, स्वजलधारा, बेलापूर
अभियान संचालक, राज्य आरोग्य अभियान, मुंबई
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
उपसंचालक, आरोग्य सेवा, विभागीय मंडळे (सर्व)
अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
तहसिलदार (सर्व)
गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सरपंच, ग्रामपंचायत (सर्व)
सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग
संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग